# मराठी भाषा विद्यापीठ


रिद्धपूर, अमरावती

Email : marathibhashauni@gmail.com

Website : www.mbv.ac.in | Contact : 98903 92254


# माहिती पुस्तिका



# मराठी भाषा विद्यापीठ

## रिद्धपूर, अमरावती

Email : marathibhashauni@gmail.com
Website : www.mbv.ac.in | Contact : 98903 92254

# माहिती पुस्तिका



# मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, अमरावती



**प्रा.डॉ. अविनाश आवलगावकर**
कुलगुरू
मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर

## कुलगुरू संदेश...

### मराठी भाषा विद्यापीठ: मराठीच्या ज्ञानवैभवाचे नवे अधिष्ठान

१९ डिसेंबर २०२३ हा दिवस महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात रिद्धपूर (जि. अमरावती) येथे 'मराठी भाषा विद्यापीठ' स्थापन करण्याचे विधेयक एकमताने मंजूर झाले आणि महाराष्ट्राच्या भाषावैभवात एक मानाचा तुरा रोवला गेला. त्यानंतर ५ सप्टेंबर २०२४ पासून हे विद्यापीठ प्रत्यक्ष कार्यरत झाले. ज्या रिद्धपूर नगरीने मराठी भाषेला धर्मभाषा आणि ज्ञानभाषेचे अलौकिक स्थान मिळवून दिले, जिथे मराठी साहित्याचा खऱ्या अर्थाने पाया रचला गेला, त्याच पावन भूमीत या विद्यापीठाची स्थापना होणे हा एक दुर्मिळ योगायोग आणि औचित्याचा सर्वोच्च बिंदू आहे.

मराठी भाषा, साहित्य आणि समृद्ध संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि त्यातील संशोधनाला गती देणे हा या विद्यापीठाच्या निर्मितीचा मूळ गाभा आहे. मात्र, हे विद्यापीठ केवळ भाषेपुरते मर्यादित नसून, ज्ञानविज्ञानाच्या सर्व कक्षा रुंदावणारे एक जागतिक केंद्र बनण्याचे स्वप्न पाहत आहे. ललित कलांपासून सामाजिक शास्त्रांपर्यंत आणि विज्ञानापासून प्रगत तंत्रज्ञानापर्यंत सर्व विषयांचा विचार मराठीच्या माध्यमातून करणे, हे विद्यापीठाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

विद्यापीठाच्या उद्दिष्टातील 'कलम ५' या संस्थेची व्यापकता अधोरेखित करते. कला, संगीत, नाट्य, चित्रकला, वास्तुकला यांपासून ते पुरातत्त्वशास्त्र, व्याकरण, धर्म-तत्त्वज्ञान, वैद्यकशास्त्र आणि अभियांत्रिकीपर्यंतच्या सर्व क्षेत्रांत प्रगत अभ्यास व संशोधनासाठी हे विद्यापीठ व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. विशेष म्हणजे, MBBS आणि M.Tech सारखे तांत्रिक अभ्यासक्रम आपल्या मायबोलीतून शिकण्याची सोय उपलब्ध करून देऊन हे विद्यापीठ एक ऐतिहासिक क्रांती घडवत आहे. ग्रामीण भागातील प्रतिभावान विद्यार्थ्यांसाठी ही संधी विकासाची नवी दारे उघडणारी ठरेल.

या विद्यापीठाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक ज्ञानशाखेच्या अभ्यासक्रमात 'मराठी साहित्याची' एक अनिवार्य अभ्यासपत्रिका असेल. यामुळे डॉक्टर असो वा इंजिनिअर, त्याची नाळ आपल्या साहित्याशी सदैव जोडलेली राहील. केवळ 'ज्ञानार्थी' नव्हे, तर उद्योगाभिमुख 'पोटार्थी' निर्माण करण्यासाठी येथे विविध कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रम (Skill-based Courses) सुरू करण्यात आले आहेत. मराठीसोबतच इतर भारतीय आणि पाश्चात्य भाषांच्या संशोधनालाही येथे वाव मिळणार आहे.

विद्यापीठासाठी निश्चित झालेल्या ५२ एकरांच्या विस्तीर्ण परिसरात लवकरच एक समृद्ध, आधुनिक आणि निसर्गरम्य शैक्षणिक संकुल आकारास येईल. हे विद्यापीठ केवळ एक वास्तू नसून, ती महाराष्ट्राच्या प्रज्ञाशक्तीचे आणि अस्मितेचे जिवंत केंद्र ठरेल. ज्ञानसमृद्ध आणि जीवनदर्शी अशा या विद्यापीठाचे क्षितिज आगामी काळात निश्चितच अधिक विस्तृत आणि तेजस्वी असेल.

## आता चला शिकूया आणि जीवन विकास साधूया, रोजगाराची संधी मिळवूया – महाराष्ट्र शासनाच्या जगातल्या पहिल्या मराठी भाषा विद्यापीठातून...

**भाषा मरता देशही मरतो संस्कृतीचाही दिवा विझे**
**गुलाम भाषिक होऊनी आपुल्या प्रगतीचे शिर कापू नका**

या कविवर्य कुसुमाग्रजांच्या उक्तीप्रमाणे भाषा ही संस्कृती आणि राष्ट्रीय अस्मितेचे अतूट नाते सांगते. भाषा नष्ट झाल्यास केवळ संवाद थांबत नाही, तर त्या भाषेसोबत समृद्ध इतिहास, परंपरा आणि सांस्कृतिक ओळखही नष्ट होते, ज्यामुळे राष्ट्र कमजोर होते. म्हणून आपल्या मातृभाषेचे महत्त्व जाणून घेणे व त्यातून शिक्षण घेणे आवश्यक आहे. मराठी भाषेतील शिक्षण म्हणजे केवळ मानवी विचार, भावना, संस्कृती आणि समाज समजून घेण्याचीच दिशा नव्हे, तर नेतृत्व, सर्जनशीलता आणि विश्लेषणात्मक विचारशक्ती, अभिरुची विकसित करणारे एक विवक्षित जीवनदृष्टी देणारे शिक्षण  आहे.

मराठी लोकभाषा ही ज्ञानभाषा होण्याच्या दृष्टीने मराठी भाषा विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे. विद्यापीठाची उद्दिष्टे आणि तिथे राबवले जाणारे अभ्यासक्रम यांचा अत्यंत जवळचा आणि तर्कसंगत संबंध दिसून येतो. विद्यापीठाने आपल्या ध्येयधोरणांनुसारच शैक्षणिक आराखडा तयार केला आहे.

मराठीचे भाषिक भांडार आणि सक्षम वापर वाढण्यासाठी 'बी.ए. मराठी (भाषाशास्त्र व लिपीविचार)', 'प्रमाणपत्र मराठी प्रशासकीय लेखन' आणि 'लेखनकौशल्ये' हे अभ्यासक्रम मराठी भाषेचा प्रशासकीय आणि तांत्रिक वापर वाढवण्याचे काम करतात. 'संकल्पनाकोश निर्मिती'च्या उद्दिष्टाला 'भारतीय ज्ञानपरंपरा' आणि 'अभिजात मराठी' यांसारखे अभ्यासक्रम पूरक ठरतील असा मला विश्वास आहे.

डिजिटल मराठी आणि भाषा अभियांत्रिकी संगणकीय भाषिक संसाधनाची निर्मिती करणे ज्ञान संपादन व रोजगार निर्मितीसाठी संसाधनाच्या उपयोजन कौशल्याचे शिक्षण प्रशिक्षण देणे आणि डिजिटल मराठी भाषेत समाजाची जडणघडण करून एक नवे सार्वजनिक संवाद विश्व उभे करण्यासाठी ज्ञानात्मक अधिष्ठान तयार करणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मराठी भाषा विद्यापीठाने 'भाषा अभियांत्रिकी व संगणकीय भाषाशास्त्र' (Language Engineering) ही स्वतंत्र प्रशाला सुरू केली आहे. 'एम.ए. संगणकीय भाषाशास्त्र', 'बी.एस्सी संगणकशास्त्र' आणि 'संगणकीय भाषाविषयक प्रयोगशाळा' (Language Lab) या अभ्यासक्रमांना सुरुवात करायचे ठरवून 'डिजिटल मराठी भाषक समाज' घडवण्याच्या दिशेने पडलेली ठोस पावले आहेत.

**भाषांतर आणि जागतिक आदानप्रदान:**

विविध भारतीय आणि विश्व भाषातील मराठीच्या आदानप्रदानाचा क्षेत्र विस्तार करणे, द्वैभाषिक, बहुभाषिक अध्ययन कौशल्य, भाषांतर कौशल्य याचा विकास करण्यासाठी मराठी भाषा विद्यापीठाने 'भारतीय व विदेशी भाषा आणि अनुवाद अभ्यास विभाग' अंतर्गत सुरू होणारे 'रशियन' आणि 'जर्मन' भाषांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम हे मराठीचे जागतिक भाषांशी आदानप्रदान वाढवण्याच्या आणि अनुवाद कौशल्ये विकसित करण्याच्या उद्दिष्टाची परिपूर्ती करतील असा विश्वास आहे.

महाराष्ट्राच्या प्रादेशिक बोलीचा, लोकविद्या, लोकसाहित्य, लोकसंस्कृतीचा अभ्यास करणे हे मराठी भाषा विद्यापीठाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे ते डोळ्यासमोर ठेवूनच मराठी भाषा विद्यापीठाने 'एम.ए. समाजभाषाविज्ञान व बोलीविज्ञान' हा अभ्यासक्रम सुरू करण्याचे ठरविले आहे. बोलीभाषेतील तूट भरून काढण्यासाठी आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासासाठी हा अभ्यासक्रम महत्त्वपूर्ण आहे. तसेच 'बी.ए. पुरातत्त्वशास्त्र' आणि 'भारतविद्या' हा विषय महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे जतन करणारा अभ्यासक्रम आहे.

पारंपरिक भाषिक वाङ्मयीन सांस्कृतिक वारशाची आधुनिक ज्ञान विज्ञान तंत्रज्ञानाशी सांगड घालणाऱ्या अभ्यासक्रमाने शोध प्रकल्प विकसित करणे ही या विद्यापीठाची उद्दिष्ट्ये आहेत. त्यानुसार 'संतसाहित्य' आणि 'महानुभाव साहित्य' यांसारखी पारंपरिक क्षेत्रे अभ्यासासाठी घेतानाच, 'Fashion Design', 'पर्यटन व्यवस्थापन' (BTTM) आणि 'गुंतवणूक व्यवस्थापन' यांसारखे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करून विद्यापीठाने आधुनिकतेची जोड दिली आहे.

ग्रामीण व आदिवासी बोली क्षेत्रातील भाषिक तूट भरून काढण्यासाठी कृती कार्यक्रम राबविणे. पारंपरिक भाषिक वाङ्मयीन सांस्कृतिक वारशाची आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालण्यासाठी 'ललितकला व हस्तकला विभाग' अंतर्गत सुरू केलेले गृहविज्ञान, सुवर्णकला आणि चर्मकला प्रमाणपत्र अभ्यासक्रम हे विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील कौशल्य विकासासाठी आणि रोजगारनिर्मितीसाठी अत्यंत प्रभावी ठरतील. असा आमचा दृढ विश्वास आहे.

'सावरकर भाषा संशोधन अध्यासन' आणि 'संतसाहित्य अध्यासन' ही केंद्रे केवळ अध्यापनच नव्हे, तर मराठी भाषेच्या संशोधनाची कक्षा विस्तारण्याचे विद्यापीठाचे मुख्य उद्दिष्ट साध्य करतात.

थोडक्यात सांगायचे तर, विद्यापीठाने केवळ ग्रंथालयीन मराठीचा विचार न करता, **प्रशासकीय, तांत्रिक, व्यावसायिक आणि संशोधनात्मक** अशा सर्व स्तरांवर मराठीला सक्षम करण्यासाठी आपला अभ्यासक्रम आराखडा (Syllabus Design) तयार केला आहे.

**डॉ. कोमल ठाकरे**
अधिष्ठाता
मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठी भाषेची सद्य:स्थिती | १ |
| २ | मराठी भाषा विद्यापीठाचे संकल्प | १ |
| ३ | मराठी भाषा विद्यापीठाची सद्य:स्थिती (Current Status) | २ |
| ४ | २०२६-२७ सत्राचे शैक्षणिक वेळापत्रक | ३ |
| ५ | शैक्षणिक अभ्यासक्रम | ५ |
| ६ | अध्यासने व केंद्र | ६ |
| ७ | विद्यापीठाचे प्रवेश धोरण आणि प्रक्रिया | ६ |
| ८ | विहित शुल्क संरचना | ८ |
| ९ | सामान्य नियम आणि शिस्त (संक्षिप्त) | ११ |
| १० | शिष्यवृत्ती (Scholarships) | ११ |
| ११ | मराठी भाषा विद्यापीठाचा भविष्यकालीन शैक्षणिक आराखडा | १२ |
| १२ | Credit Framework(UG) | १४ |
| १३ | Credit Framework(PG ) | १५ |
| १४ | अभिजात मराठी भाषा व साहित्य संशोधन केंद्र - आराखडा | १६ |
| १५ | मराठी भाषा शैक्षणिक वर्षातील उपक्रम | २२ |
| १६ | उपक्रमांची छायाचित्रे | २३ |
| १७ | विद्यापीठाच्या संबधित बातम्यांचे वार्तांकन | २४ |

## मराठी भाषेची सद्य:स्थिती:

- मातृभाषेतून संवाद व लेखनाचा समाजाचा आत्मविश्वास कमी होत चालला आहे.
- ज्ञानभाषा म्हणून इंग्रजीचे अकारण महत्त्व वाढत चालले आहे.
- समाजमाध्यमे व जनमानसातील वाढते भाषा प्रदूषण.
- शाळा व महाविद्यालयातील मराठी भाषा अध्ययन व अध्यापनातील वाढती अनास्था.
- मराठी भाषा व साहित्य संशोधनातील वाढती अनास्था.

## मराठी भाषा विद्यापीठाचे संकल्प:

- स्वभाषाभिमान जागवणे, मराठी भाषेचे महत्त्व पटवून देणे.
- मराठी भाषेतून रोजगार क्षमता विकसित करण्यास प्राधान्य देणे.
- ज्ञानभाषा म्हणून मराठी भाषेचे सामर्थ्य व कौशल्य अधोरेखित करणे.
- सर्व विषयांचे अध्यापन मराठी भाषेतून करणे.
- विविध विषयांतील ज्ञान मराठी भाषेतून समाजापर्यंत पोहोचविणे.
- सर्व ज्ञानशाखेतील प्रत्येक अभ्यासक्रमात मराठी भाषेची अभ्यासपत्रिका अनिवार्य राहील. इतर विद्यापीठांसाठीही या दृष्टीने प्रयत्न केले जातील.
- दैनंदिन जीवनात मराठी भाषेच्या वापरासाठी समाजाला प्रोत्साहित करणे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व ज्ञानशाखांच्या अभ्यासक्रमांची मराठीत भाषांतरे करणे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अमराठी माध्यमांच्या शाळेतील शिक्षकांसाठी मराठी भाषेच्या प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे.
- मराठी भाषेची अभिव्यक्तिक्षमता वाढविण्यासाठी पायाभूत संसाधनांची निर्मिती करणे.
- सुसंस्कृत समाजाच्या जडणघडणीसाठी भाषा व साहित्याचे महत्त्व विशद करणे.
- अभिजात मराठी भाषा केंद्रवर्ती ठेवून मराठी भाषा व साहित्याचे संशोधन करणे.
- मराठी भाषा व साहित्य संशोधनाला गती देण्यासाठी संशोधन पत्रिका चालविणे.
- जुन्या संशोधकांच्या मुशीतून नवसंशोधकांची पिढी तयार करणे.
- मराठी भाषिक क्षमताधिष्ठित प्रशिक्षणाद्वारे व्यावसायिक कौशल्ये निर्माण करणे.
- मराठीतून प्रमाणित व सुलभ प्रशासकीय कामकाज चालावे म्हणून प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवणे.
- मराठी माध्यमाच्या शाळा व मराठी माध्यमांच्या शाळांविषयी जनजागृती करणे.
- देश-विदेशातील संशोधकांना मराठी भाषा व साहित्य संशोधनाविषयी प्रेरित करणे.
- परदेशी मराठी शाळांना मराठी भाषा विद्यापीठाशी जोडणे.
- परदेशातील मराठी भाषकांसाठी मराठी भाषा व साहित्याचे अभ्यासक्रम तयार करणे.
- अमराठी भाषकांसाठी मराठी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम तयार करणे.
- विविध बोलींचे संरक्षण, संवर्धन आणि संशोधन करणे.
- विविध अभ्यासक्रमात बोलीतील साहित्याचा समावेश करणे.
- भाषा संशोधनाबरोबरच सांस्कृतिक चळवळीचे संशोधन करणे.

### मराठी भाषा विद्यापीठाची सद्य:स्थिती (Current Status):

- शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्थेच्या आवारातील भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीतील तीन खोल्यांतून विद्यापीठ कामकाज सुरू झाले.
- आज रोजी थीम पार्क रिद्धपूर येथे कार्यालय, वर्गखोल्या व वसतिगृहाची व्यवस्था पूर्ण झालेली आहे.
- २०२५-२६ मध्ये चार प्रशालेतील नऊ पदव्युत्तर, तेरा पदवी आणि दोन प्रमाणपत्र अभ्यासक्रमास व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळाली आहे.
- पदवी व पदव्युत्तर पातळीवरील चार अभ्यासक्रमांना प्रारंभ झालेला आहे:
  १. **बी.ए. मराठी (भाषाशास्त्र व लिपीविचार)**
  २. **बी.पी.ए. (नाट्यशास्त्र)**
  ३. **एम.ए. मराठी (अभिजात भाषा)**
  ४. **एम.ए. मानसशास्त्र**
- या चार अभ्यासक्रमांसाठी ४९ विद्यार्थ्यांचा प्रवेश झालेला आहे.
- प्रथम सत्राची परीक्षा १५ जानेवारी २०२६ ते ५ फेब्रुवारी पर्यंत रितसरपणे पार पडली.
- चार प्रशालांच्या अभ्यासमंडळांकडून विविध अभ्यासक्रम तयार केलेले आहेत.
- आचार्य (पीएच.डी.) संशोधनवर्ग सुरू करण्याची पूर्वतयारी झालेली आहे.
- भविष्यकालीन शैक्षणिक कृती आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे.
- २०२५-२६ चा अर्थसंकल्प शासनाकडून मंजूर झाला.
- पुढील तीन वर्षांसाठी प्रतिवर्षी ३.२४ कोटी शासनाकडून मंजूर झालेले आहेत.
- कुलसचिव, वित्त व लेखाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांची अतिरिक्त कार्यभार देऊन नियुक्ती.
- एका अधिष्ठातापदी पाच वर्षांसाठी नियुक्ती.
- स्वीय सहाय्यकपदी तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती.
- दैनंदिन कार्यालयीन कामकाजासाठी चार सेवकांची दैनंदिन मजुरी तत्त्वावर नियुक्ती.
- बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी तत्त्वावर 'क' वर्गातील ३ व 'ड' वर्गातील ४ नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.
- विद्यापीठासाठी ५२ एकर जागा निश्चित झालेली असून अधिग्रहण प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी शासनाकडे ९ कोटींचा प्रस्ताव सादर केलेला होता त्याला मंजूरी मिळालेली आहे.
- भारतीय अभिजात भाषा परिषदेसाठी मराठी भाषा मंत्रालयाकडून ६१,२६,४६१/- लक्ष निधी प्राप्त.
- मराठी भाषा सेतू परिषदेच्या आयोजनासाठी मराठी भाषा मंत्रालयाकडून मराठी भाषा विद्यापीठाला ३९ लक्ष प्राप्त.
- अभिजात भाषेअंतर्गत 'महानुभाव हस्तलिखित सूची खंड-१' या संशोधन प्रकल्पाच्या प्रकाशनासाठी मराठी भाषा मंत्रालयाकडून ९ लाख मंजूर.
- मराठी भाषा विद्यापीठास संशोधनासाठी निधी मिळावा यास्तव मराठी भाषा मंत्रालयाकडे संशोधन केंद्र आराखडा प्रस्ताव सादर.
- विद्यापीठासाठी निधी प्राप्त करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या नियोजन व विकास समितीच्या सहकार्याने 'निधी नियोजन समितीची' स्थापना करण्यात आली आहे.
- मराठी भाषा विद्यापीठाची वेबसाईट सुरू करण्यात आली आहे.
- मराठी भाषा विद्यापीठाचे यूट्यूब चॅनल सुरू करण्यात आले आहे.

# मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर शैक्षणिक नियमावली २०२६-२०२७

२०२६-२०२७ सत्राचे शैक्षणिक वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे

## तक्ता १ : शैक्षणिक उपक्रम आणि सत्र

| अ.क्र. | कृती/कार्यक्रम | प्रारंभ | समाप्ती | एकूण दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक सत्र (प्रथम सत्र) | सोमवार, ०१ जून २०२६ | शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ | १२४ |
| २ | प्रवेश प्रक्रिया | सोमवार, ०१ जून २०२६ | अध्यादेश नुसार | - |
| ३ | अभिक्रम प्रक्रिया (प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी) | सोमवार, ०६ जुलै २०२६ | सोमवार, १३ जुलै २०२६ | ०८ |
| ४ | शैक्षणिक दिवस (विषम सत्र) | मंगळवार, १४ जुलै २०२६ | बुधवार, ०४ नोव्हेंबर, २०२६ | ९३ |
| ५ | प्रथम सत्र अवकाश | गुरूवार, ०५ नोव्हेंबर २०२६ | मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६ | २० |
| ६ | विषम-सत्र विद्यापीठीय परीक्षा | गुरूवार, १२ नोव्हेंबर २०२६ | शनिवार, १२ डिसेंबर २०२६ | ३१ |
| ७ | शैक्षणिक सत्र (व्दितीय सत्र) | बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६ | शनिवार, २४ एप्रिल २०२७ | १२१ |
| ८ | अभ्यासक्रम पुरक दिवस (NSS स्नेहसंमेलन इ.) | सोमवार, २१ डिसेंबर २०२६ | बुधवार, ३० डिसेंबर २०२६ | ०८ |
| ९ | शैक्षणिक दिवस (सम सत्र) | गुरूवार, ३१ डिसेंबर २०२६ | शनिवार, २४ एप्रिल २०२७ | ९१ |
| १० | सम-सत्र विद्यापीठीय परीक्षा | सोमवार, २६ एप्रिल २०२७ | बुधवार, २६ मे २०२७ | ३१ |
| ११ | व्दितीय सत्र अवकाश | सोमवार, २६ एप्रिल २०२७ | शनिवार, ५ जून २०२७ | ४१ |
| १२ | पुढील शैक्षणिक सत्राचा प्रारंभ (२०२७-२८) | सोमवार, ०७ जून २०२७ | - | - |

## तक्ता २ : सण आणि सुट्ट्या

विद्यापीठाचे विभाग आणि महाविद्यालये केवळ खालील सुट्ट्या उपभोगतील; राज्य सरकार किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या इतर सुट्ट्या कुलगुरुंच्या परवानगीशिवाय घेता येणार नाहीत.

| अ.क्र. | सण/सुट्ट्या | दिवस आणि दिनांक |
|---|---|---|
| १ | स्वातंत्र्य दिन / पारशी नववर्ष दिन (शहेनशाही) | शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ |
| २ | ईद-ए-मिलाद | बुधवार, २६ ऑगस्ट २०२६ |
| ३ | रक्षाबंधन | शुक्रवार, २८ ऑगस्ट २०२६ |
| ४ | श्री गणेश चतुर्थी | सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ |
| ५ | गौरीपूजन | शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६ |
| ६ | महात्मा गांधी जयंती | शुक्रवार, २ ऑक्टोबर २०२६ |
| ७ | सर्वपित्री दर्श अमावास्या | शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ |
| ८ | दसरा | मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६ |
| ९ | गुरुनानक जयंती | मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६ |
| १० | ख्रिसमस | शुक्रवार, २५ डिसेंबर २०२६ |
| ११ | गणराज्य दिन | मंगळवार, २६ जानेवारी २०२७ |
| १२ | श्री. छत्रपती शिवाजी महाराज जयंती | शुक्रवार, १९ फेब्रुवारी २०२७ |
| १३ | रमझान ईद (ईद-उल-फितर) | बुधवार, १० मार्च २०२७ |
| १४ | होळी (दुसरा दिवस) | सोमवार, २२ मार्च २०२७ |
| १५ | गुढीपाडवा | बुधवार, ७ एप्रिल २०२७ |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | बुधवार, १४ एप्रिल २०२७ |
| १७ | श्रीराम नवमी | गुरुवार, १५ एप्रिल २०२७ |
| १८ | महावीर जयंती | सोमवार, १९ एप्रिल २०२७ |

- **अधिनियमाच्या नियामक तरतुदींनुसार निकालांची घोषणा**
- **सदर परिपत्रक विद्यापीठाच्या** www.mbv.ac.in **या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. सदर परिपत्रक मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.**

# शैक्षणिक अभ्यासक्रम

**पदवी अभ्यासक्रम :**

१. बी.ए. मराठी (भाषाशास्त्र व लिपीविचार)
२. बी.पी.ए. (नाट्यशास्त्र)
३. बी.ए. Fashion Design and Textile
४. बी.ए. संगीत
५. बी.ए. मानसशास्त्र
६. बी.ए. लोकप्रशासन
७. बी.ए. पुरातत्त्वशास्त्र आणि प्राचीन इतिहास
८. बी. ए. पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग
९. बी.ए. मुक्तकला Liberal Arts
१०. BTTM (पर्यटन आणि प्रवास व्यवस्थापन)
११. बी.एस्सी. संगणकशास्त्र
१२. बी.एस्सी. संख्याशास्त्र
१३. बी.एस्सी. गणित

**पदव्युत्तर अभ्यासक्रम:**

१. एम.ए. मराठी (अभियांत्रिकी व संगणकीय भाषाशास्त्र)
२. एम.ए. मराठी (समाजभाषाविज्ञान व बोलीविज्ञान)
३. एम.ए. अनुवादशास्त्र
४. एम.ए. मराठी (अभिजात भाषा व मराठी वाङ्मय)
५. एम.ए. मराठी (संतसाहित्य)
६. एम.ए. मानसशास्त्र
७. एम.ए. पुरातत्त्वशास्त्र आणि भारतविद्या (प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती)
८. एम.ए. भूगोल (नैसर्गिक संसाधने व पर्यावरणासह)
९. एम.ए. भारतीय ज्ञान परंपरा

- आचार्य पदवी संशोधन केंद्र (पीएच.डी.)

**प्रमाणपत्र अभ्यासक्रम:**

१. प्रमाणपत्र – रशियनभाषा
२. प्रमाणपत्र – जर्मन भाषा
३. प्रमाणपत्र – मराठी प्रशासकीय मराठी लेखन
४. प्रमाणपत्र – मराठी लेखनकौशल्ये
५. प्रमाणपत्र – प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी अभ्यासक्रम
६. प्रमाणपत्र – अमराठी भाषकांसाठी
७. प्रमाणपत्र – पटकथालेखन

### अध्यासने (Chairs/Study Centers):

- संत साहित्य अध्यासन
- महानुभाव साहित्य अध्यासन
- वि. दा. सावरकर भाषा संशोधन अध्यासन

### केंद्र:

- पुस्तकनिर्मिती व मुद्रणलेखन केंद्र
- संगणकीय भाषाविषयक प्रयोगशाळा (Language lab)
- मानसशास्त्र प्रयोगशाळा (Psychology lab)
- दृकश्राव्य प्रयोगशाळा (Audio Visual Lab)
- आकाशवाणी केंद्र

## विद्यापीठाचे प्रवेश धोरण आणि प्रक्रिया

### प्रवेश धोरण:

- स्वायत्त पदवी अभ्यासक्रमांमधील (Autonomous Degree Courses) प्रवेश पात्र परीक्षेतील किंवा तिच्या समकक्ष परीक्षेतील एकूण गुणांच्या आधारावर दिले जातील. हे नियम पदवी (UG) आणि पदव्युत्तर (PG) दोन्ही अभ्यासक्रमांसाठी लागू असतील.
- विज्ञान शाखेतील पदव्युत्तर (PG) अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी (प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित आणि सांख्यिकी), ६०% वेटेज प्रवेश परीक्षेला (बहुपर्यायी प्रश्नपत्रिका) आणि ४०% वेटेज बी.एस्सी.च्या (B.Sc.) एकूण गुणांना दिले जाईल.
- सर्व यूजी किंवा पीजी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीचे अर्ज संस्थेने अधिसूचित केलेल्या अंतिम तारखेपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. उशिरा आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
- प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण झाली असे तेव्हाच मानले जाईल जेव्हा शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण शुल्क भरले जाईल (अधिकृत पावतीसह) आणि अर्जदाराचे नाव संबंधित हजेरीपटावर येईल.
- सर्व यूजी आणि पीजी प्रवेश केवळ एका वर्षासाठी वैध आहेत आणि म्हणूनच अभ्यासाच्या प्रत्येक पुढील वर्षासाठी त्यांचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.
- विज्ञान शाखेतील पीजी अभ्यासक्रमांचे (प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र) 'अनुदानित' (Grant-in-aid) आणि 'विनाअनुदानित' (Non-grant) जागांचे प्रवेश पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारावर (Merit basis) होतील.
- एकदा विनाअनुदानित जागेवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे रूपांतर अनुदानित जागेवर केले जाणार नाही. विनाअनुदानित जागांसाठी भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

- युजी आणि पीजी अभ्यासक्रमांचा प्रवेश रद्द केल्यास शिक्षण शुल्काचा (Tuition fees) परतावा मिळणार नाही. प्रयोगशाळा शुल्क (Laboratory fees) प्रवेशाच्या तारखेपासून आठ दिवसांच्या आतच परत केले जाईल.
- विद्यापीठात थेट दुसऱ्या वर्षात (UG किंवा PG) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या समतुल्यता समितीने (Equivalence Committee) जारी केलेले समतुल्यता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## प्रवेश प्रक्रिया

### पदवी (UG) प्रवेश प्रक्रिया:

प्रथम वर्षाच्या सर्व युजी विद्यार्थ्यांचे प्रवेश स्वायत्तता (Autonomy) नियम आणि नियमावलीद्वारे नियंत्रित केले जातील.

- **टप्पा I:** संस्थेच्या वेबसाइटवर प्रवेशासाठी नोंदणी.
- **टप्पा II:** तात्पुरती गुणवत्ता यादी (Provisional merit list) प्रदर्शित करणे.
- **टप्पा III:** विद्यार्थ्यांच्या तक्रारी/हरकती (Grievances).
- **टप्पा IV:** अंतिम गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे.
- **टप्पा V:** समुपदेशन आणि प्रवेशाची पहिली फेरी.
- **टप्पा VI:** समुपदेशन आणि प्रवेशाची दुसरी फेरी.
- **टप्पा VII:** समुपदेशन आणि प्रवेशाची तिसरी फेरी.
- **टप्पा VIII:** कुलगुरूंचे संबोधन.
- **टप्पा IX:** इंडक्शन प्रोग्राम (परिचय कार्यक्रम).
- **टप्पा X:** वर्गांचे प्रारंभ.

### पदव्युत्तर (PG) प्रवेश प्रक्रिया:

- **टप्पा I:** संस्थेच्या वेबसाइटवर नोंदणी प्रक्रिया.
- **टप्पा II:** तात्पुरती गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे.
- **टप्पा III:** विद्यार्थ्यांच्या तक्रारी.
- **टप्पा IV:** अंतिम गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे.
- **टप्पा V-VII:** समुपदेशन आणि प्रवेशाच्या फेऱ्या.
- **टप्पा VIII-X:** कुलगुरूंचे संबोधन, इंडक्शन आणि वर्गांचे प्रारंभ.

**प्रवेशातील आरक्षण धोरण:**

विविध अभ्यासक्रमांमधील प्रवेश महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारावर दिले जातील:

| अ.क्र. | प्रवर्ग | आरक्षण टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती आणि बौद्ध धर्म स्वीकारलेले (SC) | १३% |
| २ | अनुसूचित जमाती (ST) | ७% |
| ३ | विमुक्त जाती (VJ) (A) | ३% |
| ४ | भटक्या जमाती (NT) (B) | २.५% |
| ५ | भटक्या जमाती (NT) (C) | ३.५% |
| ६ | भटक्या जमाती (NT) (D) | २% |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | २% |
| ८ | इतर मागासवर्गीय (OBC) | १९% |
| ९ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) | १०% |
| १० | सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग | १०% |
| ११ | खुला प्रवर्ग (Open) | २८% |

## विहित शुल्क संरचना (Prescribed Fees Structure)

### भाग – अ (पदवी अभ्यासक्रम)

| अ.क्र. | तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १ | शिक्षण शुल्क | ८०० |
| २ | माहिती पुस्तिका आणि प्रवेश अर्ज | २० |
| ३ | प्रयोगशाळा | ४०० |
| ४ | ग्रंथालय | १२० |
| ५ | खेळ आणि क्रीडा | १२० |
| ६ | अवांतर उपक्रम / व्यक्तिमत्त्व विकास | ५० |
| ७ | विद्यापीठ मासिक | ५० |
| ८ | विद्यार्थी साहाय्य निधी | २५ |
| ९ | वैद्यकीय तपासणी | ५० |
| १० | सुविधा | ५० |
| ११ | ओळखपत्र | ३० |
| १२ | घटक चाचणी / सामाईक परीक्षा | १०० |
| १३ | विमा | ५० |

## भाग – ब (पदव्युत्तर)

| अ.क्र. | तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १ | शिक्षण शुल्क | १००० |
| २ | माहिती पुस्तिका आणि प्रवेश अर्ज | २० |
| ३ | प्रयोगशाळा | ८०० |
| ४ | ग्रंथालय | १२० |
| ५ | खेळ आणि क्रीडा | १२० |
| ६ | अवांतर उपक्रम / व्यक्तिमत्व विकास | ५० |
| ७ | विद्यापीठ मासिक | ५० |
| ८ | विद्यार्थी साहाय्य निधी | २५ |
| ९ | सुविधा | ५० |
| १० | ओळखपत्र | ३० |
| ११ | घटक चाचणी / सामाईक परीक्षा | १०० |
| १२ | विमा | ५० |

## भाग – क (आभासी अभ्यासक्रम)

| अ.क्र. | तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १ | शिक्षण शुल्क | १००० |
| २ | माहिती पुस्तिका आणि प्रवेश अर्ज | २० |
| ३ | दृकश्राव्य व देखभाल शुल्क | १००० |
| ४ | घटक चाचणी/सामाईक परीक्षा | १०० |

## भाग – ड (इतर शुल्क)

| अ.क्र. | तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १ | नामांकन शुल्क | १०० |
| २ | विलंब नामांकन शुल्क | १०० |

## भाग – इ (प्रवेश रद्द करावयाचा असल्यास परत करावयाचे शिक्षण व प्रयोगशाळा शुल्क)

| अ.क्र. | तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रवेशापासून १० दिवसांपर्यंत | ७५% |
| २ | प्रवेशापासून ११ ते २० दिवसांपर्यंत | ५०% |
| ३ | प्रवेशापासून २१ दिवसाचे पुढे | निरंक |

## भाग – ई (परीक्षा शुल्क)

| | परीक्षा शुल्क | केंद्रीय मूल्यांकन शुल्क | माजी विद्यार्थी शुल्क (अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता) | प्रात्यक्षिक शुल्क (प्रति प्रात्यक्षिक) | प्रबंध/प्रकल्प शुल्क | मौखिक परीक्षा शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|
| **बी.ए. भाग १, २ व ३** | २२५ | ६० | १२० | ६५ | – | ६५ |
| **एम.ए. भाग १, २ व ३** | ३२५ | १२० | २२५ | १२० | ३२५ | ६५ |
| **विलंब शुल्क** | विहीत मुदतीनंतर रू.१०० विलंब शुल्क आकारण्यात येईल. | | | | | |
| **उत्तरपत्रिका पुनर्मूल्यांकन शुल्क २०० रुपये** | | | | | | |

## भाग – उ (आचार्य पदवी शुल्क)

| अ.क्र. | तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क | १००० |
| २ | शिक्षक शुल्क (कोर्स वर्क) | ५००० |
| ३ | नामांकन शुल्क | ५०० |
| ४ | ग्रंथालय शुल्क | १००० |
| ५ | परीक्षा शुल्क | ५०० |
| ६ | नोंदणी शुल्क | ५०० |
| ७ | वार्षिक शुल्क | ५००० |
| ८ | प्रबंधपूर्व सादरीकरण शुल्क | २००० |
| ९ | वार्षिक धारण शुल्क | --- |
| १० | प्रबंध सादर शुल्क | १२००० |

### ऊ) वसतिगृह शुल्क

| अ.क्र. | तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क | २०० |
| २ | प्रति सत्र | ९०० |

- वसतिगृहामध्ये प्रवेश निश्चित करते वेळी रू. ११०० (२००+९००) भरणे अनिवार्य आहे.
- दुसऱ्या सत्राचे शुल्क रू.९०० हे दुसरे सत्र सुरू होताच १५ दिवसाचे आत भरावे लागतील.
- विद्यार्थी वसतिगृह सोडून गेल्यास भरलेले शुल्क परत मिळणार नाही.

### सामान्य नियम आणि शिस्त (संक्षिप्त):

१. संस्थेत देणगी, लाच, भेटवस्तू इत्यादी घेण्यास सक्त मनाई आहे.
२. ७५% उपस्थिती संस्थात्मक परीक्षांच्या पात्रतेसाठी अनिवार्य आहे.
३. संस्थेच्या आवारात गणवेश आणि ओळखपत्र अनिवार्य आहे.
४. रॅगिंगवर पूर्णपणे बंदी आहे. दोषी आढळल्यास १९९९ च्या महाराष्ट्र कायद्यानुसार दोन वर्षांचा कारावास आणि १०,०००/- रुपये दंड होऊ शकतो.
५. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रात्री ७:०० नंतर बाहेर राहण्यास परवानगी नाही.

### शिष्यवृत्ती (Scholarships):

- **भारत सरकार शिष्यवृत्ती:** अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी.
- **इन्स्पायर (Inspire) शिष्यवृत्ती:** प्रति वर्ष ८०,०००/- रुपये (३ वर्षांसाठी).
- **दक्षिण फेलोशिप:** एम.ए. विद्यार्थ्यांसाठी.
- विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. मुदत संपल्यानंतर आलेल्या अर्जांची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल.

# मराठी भाषा विद्यापीठाचा भविष्यकालीन शैक्षणिक आराखडा

## अध्यापन

### १. भाषाशास्त्र व भाषा अभियांत्रिकी प्रशाला

- भाषाविज्ञान, सामाजिक भाषाविज्ञान, ऐतिहासिक भाषाविज्ञान, भाषा अभियांत्रिकी व संगणकीय भाषाविज्ञान, भाषा व लिपीविज्ञान, बोलीविज्ञान, बोलींचे भाषाशास्त्रीय आकलन, भौगोलिक बोलीविज्ञान, मनोलक्ष्यी–बोधनात्मक भाषाविज्ञान, चेतासंस्था आणि निदानीय भाषाविज्ञान.
- अभिजात मराठी भाषेचा इतिहास – शिलालेख, ताम्रपट, लिपीशास्त्र, हस्तलिखितांचा अभ्यास.
- भाषिक संवादकौशल्य (सूत्रसंचालन, आभारप्रदर्शन, सभा–संमेलनाचे आयोजन, दुभाषी व पर्यटन मार्गदर्शक, न्यायालयीन क्षेत्रात वैधानिक लेखनकौशल्ये).
- मुद्रण व प्रकाशन – संपादक, मुद्रितशोधक, चित्रकार, लेआउट डिझायनर.
- मराठीचे पायाभूत शिक्षण व गुणवत्ता संवर्धन प्रशिक्षण (व्यवसायाभिमुख भाषिक कौशल्ये, सैद्धांतिक व अध्यापनलक्ष्यी व्याकरण, बोली व प्रमाण भाषेतील आणि संकल्पनात्मक भाषाव्यवहारातील भाषिक तूट व त्यावरील उपायांचा अभ्यास).
- द्वैभाषिक भाषा शिक्षण – अमराठी भाषकांना मराठीचे आणि मराठी भाषकांना परभाषांचे शिक्षण.
- भारतीय लिपीशास्त्रांचा अभ्यास (अस्तंगत होत चाललेल्या सर्व लिप्यांचा अभ्यास व संशोधन).
- भारतीय व विदेशी भाषांतील साहित्याच्या अनुवादाचे अध्यापन, कोश–रचनाशास्त्राचे अध्यापन.

### २. कला व साहित्य प्रशाला

- ललितकला, प्रयोगनिष्ठ कला, उपयोजित कला, आदिवासी लोककला, पारंपरिक लोककला.
- स्थापत्यकला, मूर्तिकला, रंगकला, नृत्यकला, संगीतकला.
- पटकथालेखन, चित्रपटलेखन, मालिकालेखन, प्रहसने, संगीतिका, अभिनय, दिग्दर्शन, नेपथ्य.
- भारतीय व विदेशी भाषांचे अध्यापन.
- भाषांतरशास्त्र व तौलनिक साहित्याभ्यास.
- शैलीविज्ञान व व्यावहारिक समीक्षा.
- मराठी संतांचा इतिहास, संतसाहित्याचा इतिहास.
- विविध धर्मसंप्रदायांचा इतिहास.
- आधुनिक व समकालीन चळवळींचा इतिहास.

### ३. महाराष्ट्र विद्या व समाजशास्त्र प्रशाला

- भारतीय विद्यांचा व महाराष्ट्र विद्यांचा अभ्यास
- महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास
- बृहन्महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास
- विविध सामाजिकशास्त्रांचा भाषा व साहित्याच्या अनुबंधाने अभ्यास

### ४. आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाला

- जनसंपर्कविज्ञान, मुद्रित माध्यमे, जनसंपर्कमाध्यमे, डिजिटल माध्यमे, जाहिरातलेखन, निमेशन, सायबरपंक
- व्यवसाय व विपणन, विमा कर्जरोखे, भाग भांडवल, शेअर बाजार, स्वामित्वाधिकार व व्यावसायिक लेखन
- ग्रंथालय व माहितीविज्ञान, ग्रंथालयाचा इतिहास व पुरातत्त्वशास्त्र, दस्तवेजीकरणशास्त्र
- वर्गीकरणपद्धती व अभिलेख व्यवस्थापन

# Credit Framework for Under Graduate (UG)

| Level/ Difficulty | Sem | Subject-1 (Optional-1) | | | | Subject (Optional-2) | Subject-3 (Optional-3) | GE/OE | SEC | IKS | AEC | VEC | CC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4.5/100 | I | 4 Credits | | | | 4 Credits | 4 Credits | 4 Credits | - | 2 Credits (Generic | 2 Credits | 2 Credits | - | 22 |
| | II | 4 Credits | | | | 4 Credits | 4 Credits | 4 Credits | - | - | 2 Credits | 2 Credits | 2 Credits | 22 |
| **Exit option:** Award of UG Certificate with 44 credits and an additional 4 credits core NSQF course/ Internship OR Continue with Major and Minor **Continue option:** Student will select one subject among the (subject 1 and subject 2) as major and another as minor. | | | | | | | | | | | | | | |
| Level/ Difficulty | Sem | Credits Related to Major | | | | Subject (Optional-2) | Subject-3 (Optional-3) | GE/OE | SEC | IKS | AEC | VEC | CC | Total |
| | | Major core | Major Elective | VSC | FP / OJT/ CEP | | | | | | | | | |
| 5.0/200 | III | 6 Credits | - | 2 Credits | FP 2 Credits | | 4 Credits | 2 Credits | 2 Credits | - | 2 Credits | - | 2 Credits | 22 |
| | IV | 6 Credits | - | 2 Credits | FP 2 Credits | | 4 Credits | 2 Credits | 2 Credits | - | 2 Credits | - | 2 Credits | 22 |
| **Exit option:** Award of UG Diploma in Major and Minor with 88 credits and an additional 4 credits core NSQF course/ Internship OR Continue with Major and Minor | | | | | | | | | | | | | | |
| 5.5/300 | V | 10 Credits | 4 Credits | 2 Credits | 2 Credits (FP/CEP) | | 2 Credits | - | - | - | - | - | 2 Credits | 22 |
| | VI | 10 Credits | 4 Credits | 2 Credits | OJT 4 Credits | | 2 Credits | - | - | - | - | - | - | 22 |
| Total 3 Years | | 40 | 8 | 8 | 10 | 8 | 20 | 12 | 4 | 2 | 8 | 4 | 8 | 132 |
| **Exit option:** Award of UG Degree in Major with 132 credits OR Continue with Major and Minor | | | | | | | | | | | | | | |
| 6.0/400 | VII | 10 Credits (6 + 4) | 4 Credits | - | 4 Credits (RP) | | 4 Credits (RM) (T) | - | - | - | - | - | - | 22 |
| | VIII | 10 Credits (6 + 4) | 4 Credits | - | 8 Credits (RP) | | - | - | - | - | - | - | - | 22 |
| Total 4 Years | | 60 | 16 | 8 | 22 | 8 | 24 | 12 | 4 | 2 | 8 | 4 | 8 | 176 |
| Four Year UG Honours with Research Degree in Major and Minor with 176 credits OR | | | | | | | | | | | | | | |
| 6.0/400 | VII | 14 Credits (8 + 6) | 4 Credits | 0 | 0 | | 4 Credits (RM) (T) | - | - | - | - | - | - | 22 |
| | VIII | 14 Credits (8 + 6) | 4 Credits | 0 | 4 Credits (OJT) | | - | - | - | - | - | - | - | 22 |
| Total 4 Years | | 68 | 16 | 8 | 14 | 8 | 24 | 12 | 4 | 2 | 8 | 4 | 8 | 176 |
| Four Year UG Honours Degree in Major and Minor with 176 credits | | | | | | | | | | | | | | |

## Credit Framework for Under Graduate (PG)

| Level | Semester | Credits Related to Major | | Research Methodology (RM) | Internship On Job Training (OJT) | Research Project (RP) | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Major Core | Major Elective | | | | |
| 6.0 | I | 8(T) + 4(P) | 2 (T) + 2 (T/P) | 4 | 0 | 0 | **20** |
| | II | 8(T) + 4(P) | 2 (T) + 2 (T/P) | 0 | 4 (OJT) | 0 | **20** |
| **Exit option:** Award PG Diploma on completion of 44 Credits after Three Year UG Degree OR continue with PG second year | | | | | | | |
| 6.5 | III | 8(T) + 4(P) | 2 (T) + 2 (T/P) | 0 | 0 | 4 | **20** |
| | IV | 8(T) + 4(P) | 2 (T) + 2 (T/P) | 0 | 0 | 6 | **20** |
| **Total 4 Years** | | **46** | **16** | **4** | **4** | **10** | **80** |
| 2 Years-4 Sem. Award PG Degree on completion 80 credits after Three Year UG Degree or 1 Year-2 Sem PG Degree (40 credits) after Four Year UG Degree | | | | | | | |

# संशोधन

## Centre of Excellence

## अभिजात मराठी भाषा व साहित्य संशोधन केंद्र – आराखडा

**उद्दिष्टे:**

- अभिजात मराठी भाषा केंद्रवर्ती ठेवून मराठी भाषा व साहित्याचे संशोधन करणे.
- मराठी भाषा व साहित्य संशोधनाचे महत्त्व अधोरेखित करणे.
- ज्ञानभाषा म्हणून मराठी भाषेचे सामर्थ्य व कौशल्य अधोरेखित करणे.
- विविध विषयातील ज्ञान मराठी भाषेतून समाजापर्यंत पोहोचविणे.
- मराठी भाषा व साहित्य संशोधनाला गती देण्यासाठी पत्रिका चालविणे.
- जुन्या संशोधकांच्या मुशीतून नवसंशोधकांची पिढी तयार करणे.
- मराठी भाषिक क्षमताधिष्ठित प्रशिक्षणाद्वारे व्यावसायिक कौशल्ये निर्माण करणे.
- अमराठी भाषकांसाठी मराठी भाषेचे अध्ययन करणे.
- देश-विदेशातील संशोधकांना मराठी भाषा व साहित्य संशोधनाविषयी उद्युक्त करणे.
- परदेशस्थ मराठी भाषकांच्या मनात मराठी भाषेविषयी गोडी निर्माण करणे.
- विविध बोलींचे जतन करणे.
- भाषा संशोधनाबरोबरच सांस्कृतिक चळवळींचे संशोधन करणे.

**१. भाषा संशोधन विभाग:**

- शिलालेख, ताम्रपटांपासून आधुनिक काळापर्यंत झालेल्या भाषेच्या कालिक भेदांवर संशोधन.
- मराठीतील व्याकरण व्यवस्थेचे पुनर्संशोधन (मराठी भाषा व बोलींचे व्याकरण).
- मध्ययुगीन व आधुनिक साहित्याची बोली रूपे.
- भाषेची अभिव्यक्ती व परिवर्तने.
- भाषेचे भिन्नस्तरीय उपयोजन (व्यापाऱ्यांची, कीर्तनकारांची, रंगकर्मींची, स्त्रियांची, बालकांची व श्रमिकांची भाषा).
- व्यावसायिक क्षेत्रातील भाषिक उपाययोजनांचा अभ्यास (शासकीय-प्रशासकीय, वैद्यक, अभियांत्रिकी, वाणिज्य-उद्योग, शिक्षण, विधी-कायदा, जाहिरात, प्रसारमाध्यमे, धार्मिक-आध्यात्मिक अशा लघुक्षेत्रातील शब्दकोश).
- साहित्याचा शैलीवैज्ञानिक अभ्यास.
- आधुनिक परिप्रेक्ष्यातून भारतीय साहित्यशास्त्राचे पुनर्संशोधन.
- आधुनिक परिप्रेक्ष्यातून पाश्चात्य साहित्य शास्त्राचे पुनर्संशोधन.
- भाषिक पर्यावरणाचा अभ्यास (सामाजिक, स्तरभेद, सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक व धर्मनिहाय इत्यादी)
- भारतीय लिपीशास्त्रांचा अभ्यास (अस्तंगत होत चाललेल्या सर्व लिपींचा अभ्यास व संशोधन)

- क्षेत्रीय भाषाविज्ञान, भूगोल व महाराष्ट्रातील विविध बोलींचे भाषिक व सामाजिक सर्वेक्षण
- बोलींचे व्याकरण व समाजभाषावैज्ञानिक संशोधन
- आदिवासींच्या विविध बोली सर्वेक्षण व संशोधन
- भटक्या विमुक्तांच्या बोलींचा अभ्यास
- सीमावर्ती भागातील भाषिक संकरांचा अभ्यास
- भाषा व आंतरविद्याशाखीय संशोधन

## २. प्रागैतिहासिक साहित्य संशोधन विभाग:

- गीता, वेद, उपनिषदे, पुराणे, षटशास्त्रे, भागवत, रामायण, महाभारत इत्यादी आर्ष महाकाव्यांचे संशोधन, संपादन आणि मराठी भाषेत अनुवाद
- विविध भारतीय भाषांतील महाभारतांचा तौलनिक अभ्यास
- विविध भारतीय भाषांतील रामायणांचा तौलनिक अभ्यास

## ३. मध्ययुगीन साहित्य संशोधन विभाग:

- मध्ययुगीन कालखंडातील अनेक हस्तलिखितांचे संशोधन व संपादन
- मध्ययुगीन कालखंडातील साहित्याचे जीवनमूल्याधिष्ठित संशोधन
- मध्ययुगीन साहित्याचे नव्या साहित्यलक्ष्यी दृष्टिकोनातून आकलन व मूल्यमापन
- संतसाहित्याचे विज्ञाननिष्ठ दृष्टीने संशोधन
- सांस्कृतिक परिप्रेक्ष्यातून संत साहित्याचे अध्ययन (ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक पर्यावरण शास्त्रीय, इत्यादी)
- भारतीय दर्शनशास्त्रे व मध्ययुगीन मराठी संतसाहित्य
- महाराष्ट्रातील विविध धर्मसंप्रदायांचे तत्त्वज्ञान व साहित्य यांचे पुनर्संशोधन
- मराठीतील बखर वाङ्मयाचे पुनर्संशोधन व संपादन
- शाहिरी वाङ्मयाचे पुनर्संशोधन व संपादन
- शिलालेख आणि ताम्रपटांचे संशोधन व संपादन
- मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहासाचे पुनर्संशोधन व लेखन
- अप्रकाशित हस्तलिखितांचे संशोधन व संपादन
- संतांच्या अभंगगाथांचे पुनर्संशोधन व संपादन
- मध्ययुगीन हस्तलिखितांची संप्रदायनिहाय सूची

## ४. आधुनिक साहित्य संशोधन विभाग:

- आधुनिक मराठी वाङ्मयेतिहासाचे पुनर्संशोधन व लेखन
- वाङ्मयप्रवाहानुसार वाङ्मयेतिहास लेखन
- विविध वाङ्मयप्रकारानुसार आधुनिक साहित्याचे संशोधन
- भारतीय साहित्याच्या परिप्रेक्ष्यात मराठी साहित्याचे संशोधन

- जागतिक साहित्याच्या परिप्रेक्ष्यात मराठी साहित्याचे संशोधन
- वाङ्मयप्रवाहानुसार वाङ्मयेतिहास लेखन
- मराठी नियतकालिकांचा इतिहास
- मराठी रंगभूमीचा इतिहास
- मराठी बालसाहित्याचा इतिहास

### ५. आदिवासी व लोकसाहित्य संशोधन विभाग:

- म्हणींच्या उत्पत्ती कथा
- विविध जाती जमातींची लोकगीते, लोककथा, लोककथागीते इत्यादी संशोधन आणि संपादन
- आदिवासींचे लोकसाहित्य आणि त्यांचे संशोधन व संपादन
- आदिवासी कलांचे संशोधन व संपादन
- आदिवासींचा सांस्कृतिक इतिहास
- भटक्या विमुक्तांचा सांस्कृतिक इतिहास
- महाराष्ट्रातील लोककलांचा इतिहास
- महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास
- महाराष्ट्रातील विविध बोली: सर्वेक्षण आणि संशोधन

### ६. साहित्य व इतर कला संशोधन विभाग:

- मराठी रंगभूमीचा इतिहास
- मराठी चित्रपटांचा इतिहास
- मराठी संगीत कलेचा इतिहास
- मराठी नृत्यकलेचा इतिहास
- मराठी चित्रकलेचा इतिहास

### ७. कोशनिर्मिती विभाग:

- सांकेतिक बोलींचा कोश
- आदिवासी बोलींचे कोश
- श्रमिकांच्या बोलींचा कोश
- मराठीच्या विविध बोलींचे कोश
- विरुद्धार्थी शब्दांचा कोश
- म्हणी व वाक्प्रचार कोश
- मराठी व्युत्पत्तिकोश
- महाराष्ट्रातील विविध जाती-जमाती व पोटजातींचा कोश
- विविध जातींच्या बोलींचा कोश
- मध्ययुगीन साहित्याचा शब्दकोश

- महाराष्ट्र लोकसंस्कृतीकोश
- कलासाहित्य कोश
- मराठी नियतकालिकांची वर्णनात्मक सूची
- विविध धर्म संप्रदायांच्या हस्तलिखितांची सूची
- लोक व्यवहारातील वस्त्र प्रावरणे, दागिने, शस्त्रे, अवजारे व भांडी यांचे सचित्र शब्दकोश
- विविध कलांचा कोश (हस्तकला, चित्रकला, रंगकला, वस्त्रकला, अलंकार कला इत्यादी)
- महाराष्ट्रातील गड-किल्ले यांचा कोश
- मराठीतील शिव्यांचा शब्दकोश
- बहुभाषा शब्दकोश (मराठी व इतर भाषा)
- अद्ययावत इंग्रजी-मराठी शब्दकोश
- अद्ययावत मराठी-इंग्रजी शब्दकोश
- अद्ययावत मराठी शब्दलेखन कोश
- वाक्यरचना कोश
- अद्ययावत मराठी-हिंदी शब्दकोश
- अद्ययावत हिंदी-मराठी शब्दकोश
- अद्ययावत संस्कृत-मराठी शब्दकोश
- अद्ययावत मराठी-संस्कृत शब्दकोश
- महाराष्ट्रातील देवी-देवतांचा कोश
- महाराष्ट्रातील मठ-मंदिरांचा कोश
- मराठी नियतकालिकांचा कोश

## ८. अनुवाद विभाग :

- अनुवाद प्रक्रियेचे अध्यापन करणे.
- विविध भाषांमधील मध्ययुगीन व आधुनिक साहित्यांचे अनुवाद करणे
- गीता, वेद, उपनिषदे, पुराणे, षटशास्त्रे, भागवत, रामायण, महाभारत इत्यादी आर्ष महाकाव्यांचा मराठी भाषेत अनुवाद करणे.
- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सर्व विद्याशाखांमधील सर्व विषयांचे शिक्षण दिले जावे असे आहे. त्या अनुषंगाने सामाजिकशास्त्रे, विज्ञान, तंत्रज्ञान, वाणिज्य, इत्यादी विविध विषयांचे मराठी भाषेतून अध्यापन करण्यासाठीचे भाषांतर करण्यात येईल.

## ९. शैक्षणिक सेवा केंद्र विभाग:

### अ) संशोधन प्रशिक्षण वर्ग :

- नवे संशोधक घडविण्यासाठी प्रशिक्षण सेवा केंद्र असण्याची आवश्यकता आहे. उदा. शब्दकोश निर्मितीसाठी शब्दकोशनिर्मितीचे प्रशिक्षण देणे, तसेच उपरोक्त संशोधन विभागातील विविध प्रकल्प

राबविताना त्या-त्या नव्या संशोधकांना त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून योग्य मार्गदर्शन देणे आवश्यक आहे.

**आ) भाषिककौशल्य अध्यापन वर्ग :**

- मराठी भाषेच्या अध्यापकांना मराठी भाषेच्या अध्यापनासंबंधीचे अद्यावत प्रशिक्षण देणे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रादेशिक भाषांना दिलेले महत्त्व लक्षात घेऊन प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालयीन मराठी भाषाशिक्षकांना मराठी भाषेचे अध्यापन प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे.
- व्यावसायिक भाषिक उपयोजन प्रशिक्षण (भाषालेखन वर्ग, प्रमाणलेखन वर्ग, शासकीय कामकाजासाठी मराठी प्रशिक्षण वर्ग प्रमाणपत्र अभ्यासक्रम इत्यादी.)
- अमराठी भाषकांसाठी मराठी प्रशिक्षण वर्ग
- देश-विदेशातील मराठी भाषकांसाठी प्रशिक्षण वर्ग

**इ) प्रकाशन :**

- नियतकालिक - मराठी भाषा व साहित्य विषयक संशोधनास वाहिलेले एक नियतकालिक सुरू करणे.
- ग्रंथ प्रकाशन - मौलिक, संशोधन, अनुवाद, संपादन इत्यादी साहित्यांचे मुद्रित व ई-प्रकाशने करणे.

**ई) ग्रंथालय :**

- भाषा व साहित्य संशोधनात पूरक संदर्भ-साहित्य पुरविणारे समृद्ध ग्रंथालय सुरू करणे.

**उ) मुद्रण व्यवस्था :**

- नियतकालिक व मौलिक ग्रंथांचे संशोधनकेंद्रांच्या वतीने प्रकाशन करण्यासाठी मुद्रणालय सुरू करणे.

## भाषा प्रयोगशाळा :

**१. ध्वनिशास्त्र / उच्चारणशास्त्र प्रयोगशाळा:**

भाषाभ्यासक विद्यार्थी तसेच संशोधकांसाठी अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त अशी उच्चारणशास्त्र प्रयोगशाळा अत्यंत आवश्यक आहे. लिपी आणि उच्चारण यांमधील तफावत, भाषा अध्ययन / अध्यापन या क्षेत्रांत संशोधन, बोली अभ्यास, भाषिक सामग्रीचे प्रतिलेखन व विश्लेषण करणे या सर्व गोष्टींसाठी उच्चारणशास्त्र प्रयोगशाळेची आवश्यकता आहे.

**ध्वनिशास्त्र प्रयोगशाळेची उपयोगिता:**

- भाषाविज्ञान या ज्ञानशाखेवरील संशोधन करण्यासाठी.
- अमराठी विद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकविण्यासाठी.
- संशोधकांना परकीय भाषा समजून घेण्यासाठी.
- फॉरेन्सिक्स् या नवीन ज्ञानक्षेत्रातील अध्यापन - संशोधन कार्यासाठी.

- Text to speech (TTS), Speech and Speaker recognition, speech synthesis
- Transcription
- -rticulatory, acoustic and auditory analysis of data
- भाषिक ध्वनींचा यांत्रिक अभ्यास करण्यासाठी.
- बोलण्यातील विकारांसंबंधीच्या मूल्यांकनासाठी तसेच उपचारापूर्वीच्या विश्लेषणाच्या तंत्रज्ञानात उपयोगी.
- बहुभाषा / बोलींच्या तुलनात्मक अभ्यासासाठी.

या प्रयोगशाळेत उच्चारणशास्त्र शिकविताना Praat, Multispeech, Video Phonetics, Electoglottograph इत्यादी सॉफ्टवेअर्सची (softwares) आवश्यकता आहे. ध्वनिशास्त्र किंवा उच्चारणशास्त्राचा अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी रेकॉर्डिंग रूमची (Recording Room) आवश्यकता असते. प्रयोगशाळेच्या भिंती आणि छत यांना अकौस्टिक ट्रीटमेंट (Acoustic Treatment) करणे आवश्यक असते.

२. **संगणकीय भाषाविज्ञान प्रयोगशाळा (Computational Linguistics Laboratory):**

संगणकीय भाषाविज्ञान हे भाषाविज्ञान आणि संगणकविज्ञान या विद्याशाखांवर आधारित असे आंतरविद्याशाखीय क्षेत्र आहे. आधुनिक भाषाविज्ञानाच्या विकासाच्या दृष्टीने संगणकीय भाषाविज्ञानाची प्रयोगशाळा अतिशय महत्त्वाची आहे.

**संगणकीय भाषाविज्ञान प्रयोगशाळेची उपयोगिता:**

भाषाविज्ञान विभागातील संशोधन करण्यासाठी संगणकीय भाषाविज्ञान प्रयोगशाळा महत्त्वाची ठरते. प्रयोगशाळेच्या सत्रांमध्ये प्रात्याक्षिके दाखविणे आणि त्यासंबंधित ऑनलाइन/ऑफलाइन साधनांचा अनुभव समाविष्ट असतो. यामध्ये पार्सर, शब्दबंध, पी.ओ.एस. टॅगिंग, टूलबॉक्स, लेक्सिस प्रो, फ्लेक्स (एसआयएल इंटरनॅशनल), वेबसर्फर, पाइ वाचक (स्पीच सिंथेसायझर), यांत्रिक भाषांतर इत्यादी.

भारतीय भाषा आणि इंग्रजीसाठी विकसित केलेल्या विश्लेषित (रपर्पोरींशव) कॉर्पस सारख्या विशेष साधनांनी ही प्रयोगशाळा सुसज्ज असावी. प्रस्तावित विभागांमध्ये कॉर्पस डेव्हलपमेंटसारखे उपक्रम राबविण्यात येतील.

प्रयोगशाळेत विविध संशोधन केले जाऊ शकते व त्याद्वारे मराठीसाठी अनेक संगणकीय भाषाविज्ञानाच्या साधनांचा (AI tools) विकास केला जाऊ शकतो. पर्यायाने याद्वारे यांत्रिक अवलोकनाद्वारे (मशिन लर्निंग, डिप लर्निंग) कृत्रिम बुद्धीसारख्या नवीन शाखांचा विकास केला जाऊ शकतो.

**पुरस्कार:**

मराठी भाषा विद्यापीठाचा पहिला वर्धापनदिन ०५ सप्टेंबर, २०२५ रोजी साजरा करण्यात आला. त्यात दोन पुरस्कार प्रदान करण्यात आले:

१. **मराठी भाषा गौरव पुरस्कार:** प्रख्यात भाषातज्ज्ञ व व्याकरणतज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख (वय १०१ वर्षे) यांना प्रदान करण्यात आला.
२. **समाजभूषण गौरव पुरस्कार:** प्रख्यात समाजसेवक श्री अशोक काकडे यांना प्रदान करण्यात आला.

- **योगा दिवस:** मा. कुलगुरू, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी २१ जून, २०२५ रोजी साजरा केला.
- **ग्रंथालय:** मराठी भाषा विद्यापीठाचे 'श्री म्हाइंभट्ट ग्रंथालय' सुरू करण्यात आले.
  विद्यापीठाचे बोधचिन्ह, ब्रीदवाक्य व झेंडा तयार करण्यात आला आहे.
- **भारतीय अभिजात भाषा परिषद:** दिनांक ०६, ०७ व ०८ ऑक्टोबर, २०२५ रोजी भारत सरकारने मान्यता दिलेल्या ११ अभिजात भाषांची परिषद मराठी भाषा मंत्रालयाच्या सहकार्याने घेण्यात आली. त्यासाठी उद्घाटक म्हणून मा. नामदार श्री चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उपस्थित होते. नामदार उदयजी सामंत, मराठी भाषा मंत्री, महाराष्ट्र शासन उपस्थित होते. तसेच मराठी भाषा मंत्रालयाचे मुख्य सचिव मा. डॉ. किरण कुलकर्णी व इतर सचिवही उपस्थित होते. या परिषदेसाठी ११ भाषांतील ५५ तज्ज्ञांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी 'भाषिणी'च्या माध्यमातून या परिषदेचे आयोजन केल्याने प्रत्येक भाषकाला त्याच्या भाषेतून संवाद साधता आला. या परिषदेसाठी मराठी भाषा मंत्रालयाने ६१,२६,४६१/- लक्ष रूपये मंजूर केले होते.
- **वंदे मातरम:** वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त, 'बंकिमचंद्रांचे वंदेमातरम विचार, मूल्ये आणि नवे भारतदर्शन' या विषयावर डॉ. हरिदास आखरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
- **भारतीय संविधान दिवस:** मा. कुलगुरू यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व विशद केले व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची शपथ दिली.
- बोलींचा जागर, जागतिक कामगार दिन, चक्रधर स्वामी अवतार दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वाण दिन, वीरबाल दिन, स्वामी विवेकानंद व जिजाऊ जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, नशामुक्त अभियान इत्यादी अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# उपक्रमाची छायाचित्रे













## रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज जयंती संपन्न




## मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर



रिद्धपूर : मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रसंगी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांनी त्यांच्या शिक्षणप्रेमी व समतावादी कार्याचा गौरव केला, तसेच विद्यार्थ्यांनी भाषणे, कविता सादर करत ज्ञान, समता आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. या निमित्ताने त्यांच्या विचारांची ज्योत आजही तितकीच तेजस्वी असल्याचे अधोरेखित झाले.

यावेळी सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठी भाषा विद्यापीठात मराठी भाषा गौरवदिन उत्साहात साजरा






## रिद्धपूरला मराठी भाषा विद्यापीठ होणे हे सर्व मराठी भाषिकांचे स्वप्न होते : कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर



## जूनपासून रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठाचा शुभारंभ





# मराठी भाषा विद्यापीठ

## रिद्धपूर, अमरावती

Email : marathibhashauni@gmail.com
Website : www.mbv.ac.in | Contact : 98903 92254